पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/पीएच.डी./2025/56
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : - 6 JAN 2025

# परिपत्रक

## (पीएच.डी. कोर्स वर्क मधील अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती बाबत)

सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य, पीएच.डी. संशोधन केंद्र व मा. संचालक सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पीएच. डी. कोर्स वर्क अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थ्यांची (Fresh/Repeter) परीक्षा जुलै-२०२४ मध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा निकाल विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाच्या अनुषंगाने काही पीएच. डी. कोर्स वर्क मधील विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रमातील विषयांकरीता दुरध्वनीवरुन संपर्क साधून व प्रत्यक्षात विभागामध्ये भेट देऊन उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photo Copy) मिळणेबाबत वारंवार मागणी करत आहेत. परंतू प्रस्तुत विद्यापीठाकडील ORDINANCE 106 (B) 2015 Sr.No.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे Ph. D. Course Work च्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणेबाबत तरतूद नसल्याचे निदर्शनास येत नाही.

तरी सर्व संलिग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य, पीएच.डी. संशोधन केंद्र व मा. संचालक सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांनी आपल्या संशोधन केंद्रामधील संबंधित सर्व संशोधन विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठाकडील ORDINANCE 106 (B) 2015 Sr.No.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे Ph. D. Course Work च्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photo Copy) मिळणेबाबत तरतूद नसल्याची बाब निदर्शनास आणून द्यावी.

सदर, परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य / संचालक, विद्यापीठ संकुल यांनी संशोधन विद्यार्थी, शिक्षक, संशोधक मार्गदर्शक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सत्वर निदर्शनास आणावे व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:-
१. मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख, संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ
२. शैक्षणिक संशोधन आणि विकास, प्रस्तुत विद्यापीठ
३. संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ